# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक ०६/१२/२०१७

## *पोलीस माओवादी चकमकीत ०७ जहाल माओवादी ठार*

➢ *गडचिरोलीच्या नक्षलविरोधी अभियानाच्या इतिहासातील सर्वात मोठे यश*

उपविभाग सिरोंचा अंतर्गत उपपोस्टे झिंगाणुर येथील मौजा कल्लेड जंगल परीसरात गडचिरोली पोलीसांचे सी-६० कमांडो पथक मिळालेल्या गोपनिय माहीतीवर नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना आज दिनांक ०६/१२/२०१७ रोजी सकाळी ०६.०० ते ०७.०० वा. च्या दरम्यान पोलीस आणि माओवादी यांच्यामध्ये चकमक झाली. कल्लेड जंगल परीसरात पोलीस पथक नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना जंगलात दबा धरुन बसलेल्या अज्ञात माओवादयांनी पोलीस पथकांच्या दिशेने पोलीसांना जीवे मारण्याच्या उददेशाने अंदाधुंद गोळीबार केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल स्वसंरक्षणार्थ माओवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. चकमकीनंतर शोधमोहीम राबविली असता ०७ जहाल माओवादयांचे मृतदेह मिळुन आले. मृत ०७ माओवादयांपैकी ०५ महिला माओवादी असून ०२ पुरुष माओवादी आहेत. माओवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन माओवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

मृतकांपैकी ०६ जणांची ओळख पटली असुन, ओळख पटलेल्यांची नावे

१) आयतु ऊर्फ अशोक कंगा पेंदाम, वय ३८ वर्ष रा. लिंगमपल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली (अहेरी दलम कमांडर). शासनाद्धारा जाहीर बक्षीस रुपये ८ लाख.

२) सरिता रा. कवंडे जि. बिजापुर, छत्तीसगड (सिरोंचा दलम सदस्य) शासनाद्धारा जाहीर बक्षीस रुपये २ लाख.

३) चंदु, सिरोंचा ए.सी.एम., शासनाद्धारा जाहीर बक्षीस रुपये ६ लाख

४) शैला, रा. पोकुर, ता. भामरागड (पेरमिली दलम सदस्य), शासनाद्धारा जाहीर बक्षीस रुपये २ लाख.

५) अखिला कुळमेथे, रा. कापेवंचा उपपोस्टे राजाराम (खां.), ता. अहेरी (प्लाटुन क्र. १४ सदस्या), शासनाद्धारा जाहीर बक्षीस रुपये ४ लाख.

६) सुनिता कोडापे, रा. सिंधा, उपपोस्टे देचलीपेठा, ता. अहेरी (सिरोंचा दलम ए.सी.एम.) शासनाद्धारा जाहीर बक्षीस रुपये ६ लाख.

तसेच ०१ मृत महीला माओवादयांची ओळख अजुन पटली नसुन ओळख पटविण्याचे कार्य सुरु आहे. चकमकीनंतर पोलीस पथकांनी घटनास्थळाचा शोध घेतला असता घटनास्थळावर ०२ एस.एल.आर., ०२ आठ एम.एम. रायफल, ०२ बारा बोअर रायफल, ०१ बारा बोअर कट्टा, सह दारुगोळा माओवादी पत्रके, साहीत्य मोठया प्रमाणात जप्त करण्यात आले. चकमकीनंतर सदर जंगल परिसरात तीव्र नक्षल विरोधी शोध मोहिम राबविण्यात येत आहे .

पी.एल.जी.ए. सप्ताह दरम्यान प्रथमच माओवादयांचे मोठे नुकसान नक्षलविरोधी अभियानमध्ये झाले आहे. यापुर्वी गोविंदगाव (२०१३) चकमकीमध्ये एकाच वेळी ०६ माओवादयांचे मृतदेह सी-६० कमांडो पथकाला चकमकीदरम्यान मिळाले होते. आतापर्यतच्या सी -६० कमांडोंच्या अभियानामध्ये आज कल्लेड येथे मिळालेले हे सर्वात मोठे यश आहे. आपले अस्तित्व दाखविण्यासाठी माओवादी सामान्य आदीवासी व दलित नागरीकांना पोलीस खबरी घोषीत करुन त्यांची क्रुरपणे खुन करतात. त्याला गडचिरोली पोलीसांनी आजच्या अभियानाद्धारे चोख प्रत्युत्तर दिले आहे.